प्रकरण – सहा

# प्रादेशिक कादंबऱ्यांतील प्रादेशिकता

प्रकरण – सहा

# प्रादेशिक कादंबऱ्यांतील प्रादेशिकता

०१. **प्रास्ताविक**

०२. **गोमंतक**

२.१ भावीण

२.२ आमचे गोय, आमका जायं

०३. **कोकण**

३.१ पडघवली

३.२ इंधन

०४. **पश्चिम महाराष्ट्र**

४.१ बनगरवाडी

४.२ गोतावळा

०५. **विदर्भ**

५.१ धग

५.२ झेलझपाट

०६. **मराठवाडा**

६.१ पाचोळा

६.२ विषवृक्षाच्या मुळ्या

०७. **समारोप**

०८. **संदर्भ व टीपा**

प्रकरण – सहा

# प्रादेशिक कादंबऱ्यांतील प्रादेशिकता

## ०१. प्रास्तविक :

मराठी कादंबरीकारांनी प्रादेशिक कादंबऱ्या लिहिताना महाराष्ट्रातील विविध भागाच्या पार्श्वभूमीचा वापर केला आहे. प्रादेशिक कादंबरी हा ग्रामीण कादंबरीचा अधिक वास्तवपूर्ण आविष्कार आहे. म्हणूनच भौगोलिक दृष्टया अस्तित्वात असलेला एक वैशिष्टयपूर्ण प्रदेश तेथील मानवसमूह,त्यांची वैशिष्टयपूर्ण बोली, तेथील वैशिष्ट्यपूर्ण निसर्ग यांचे चित्रण प्रादेशिक कादंबरीतून दिसते.

प्रादेशिकता प्रादेशिक साहित्यात प्रमुख घटक असतो. साहित्यातील पात्राप्रमाणेच प्रादेशिकतेला महत्व असते. पात्राशिवाय प्रादेशिकता रूक्ष असते.तर प्रादेशिकतेशिवाय पात्रे निर्जीव असतात. प्रदेशाच्या भौगोलिक, नैसर्गिक लकबी – वैशिष्टयांसह पात्रे वावरत असतात. पात्रे संबंध मानवी समूह जिवंत करत असतात. प्रादेशिक जीवनचित्रणामुळे मराठी कादंबरी आशयदृष्टया समृध्द झाली आहे. या कादंबऱ्यांमधून प्रकट झालेली प्रादेशिकता ही त्या प्रदेशातील लेखकांनी जाणीवपूर्वकच प्रकट केली आहे असे नाही. कादंबरीकार त्याला आकलन झालेल्या जीवनानुभवाचे स्वरूप त्याच्या अंगी असलेल्या कल्पनासामर्थ्यसह कादंबरीत प्रकट करीत असतो. हे करीत असताना लेखकाने लिहिलेल्या कादंबरीतून त्या प्रदेशातील प्रादेशिकता शोधता येते. ज्या विशिष्ट अशा विविध घटकांतून प्रादेशिकतेचा प्रभाव करता येईल.ते काही घटक पुढीलप्रमाणे आहेत.

## ०२. गोमंतक :

भौगोलिक घटकाचा विचार होतो. गोवा किंवा गोमंतक हा प्रदेश भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील कोकणपट्टीचा दक्षिणेकडील भाग होय.

उत्तरेस सावंतवाडी व वेंगुर्ला पेटा, पूर्वेस बेळगाव जिल्हा दक्षिणेस कारवार जिल्हा व पश्चिमेस अरबी समुद्र अशा त्याच्या चर्तु: भीमा आहेत. 'मांडवी' व 'अद्यनाशिनी' या दोन गोव्यातल्या मोठ्या नद्या होय. गोव्यातून वाहणारी तिवरी मोठी नदी म्हणजे तेरेखोलची खाडी होय. सह्याद्रीचे फाटे असलेले असे अनेक डोंगर गोमंतकात आहेत. गोमंतकाच्या पूर्वसीमेवर सोंसोगड डोंगर, उत्तरेस वाघेरीचा डोंगर. मोर्लेगड हा डोंगर आहे. बोरीचा सिध्दनाथ व पारोडे येथील चंद्रनाथ हे सपाटीवरचे डोंगर असून ते सृष्टिसौंदर्याने नटलेले आहेत. गोपकपट्टण हे गाव 'अद्यनाशिनी' नदीवरचे एक बंदर होते. याच नगराला 'गोवापुरी' असेही म्हणत. या बंदरातून गोव्याचा परदेशांशी व्यापार चाले.

गोमंतकातील ग्रामसंस्था ही वैशिष्ट्यपूर्ण आहे. गावाभोवतलच्या जमिनी गावकऱ्यांच्या सामुदायिक मालकीच्या असाव्या, त्या सर्वांनी सामुदायिक कसाव्या, त्यातील उत्पन्न सर्वांनी विभागून घ्यावे, गावगाडा चालविण्यासाठी गावकऱ्यांतून पंचमंडळी निवडावी तिनेच गावाची व्यवस्था राखावी, गावातला न्याय –निवडा करावा, गावाच्या उत्कर्षाच्या योजना आखून त्या पार पाडाव्या व सर्व प्रकारे गाव स्वयंपूर्ण होईल परंतु. पोर्तगीजांनी या ग्रामसंस्थांच्या रचनेत पुष्कळ बदल केले व त्यांना सहकारी शेतकी सोसायट्यांचे स्वरूप दिले. आज गोव्यातील लागवडीखाली आलेल्या जमिनीपैकी दोन तृतीयांश जमीन ग्रामसंस्थांच्या सामुदायिक मालकीची असून, एक तृतीयांश वैयक्तीक मालकीची आहे. प्रथम जे कोणी गोमंतकात वसाहतीकरता आले त्यांनी जंगल तोडून जमीन शेतीयोग्य करून त्यातील काही भागात वस्ती केली. या शेतीयोग्य जमिनीच्या कसानुसार तिचे तीन प्रकार करण्यात आले.

१. भाताच्या पिकाखालीले पहिल्या प्रतीची जमीन, २. आंब्याच्या, सुपारीच्या व नारळीच्या बागा तयार करण्यासाठी मधल्या प्रतीची जमीन ३. नाचणी उडीद वगैरे वरकस पिके देणारी निकृष्ट प्रतीची जमीन या जमिनी गावकऱ्यांनी सामुदायिकपणे कसायच्या असत.ग्रामसभेतून पंचांची निवड केली जाई व ही पंचमंडळी गावाचा कारभार करीत असत.

गोमंतकात कुलदेवता, ग्रामदेवता व उपास्य देवता अशी तीन प्रकारची दैवते आहेत. सारस्वत, कऱ्हाडे व दैवज्ञ यांच्याच कुलदेवता आहेत. सारस्वत ब्राम्हणांनी आपल्याबरोबर मंगेश, शांतादुर्गा, नागेश, रामनाथ, महालक्ष्मी, म्हाळसा, सप्तकोटीश्वर, दामोदर इत्यादी कुलदैवत होय.

गोमंतकातील स्थानदैवतांमध्ये अनेक दैवतांचा समावेश होत असला तरी भूमिदेवता ही मुख्य स्थानदेवता आहे. दुर्गा ही अनेक गावांतून ग्रामदेवता म्हणून भजली जाते शांतदुर्गा, नवदुर्गा, अजादुर्गा वगैरे विविध रूपांनी ती ओळखली जाते. तसेच खळनाथ, भैरव, वेताळ इ. देवताही ग्रामदेवता म्हणून उपासिल्या जातात. गोमंतकात दत्तोपासना विठ्ठल उपासना ह्या दोन उपास्य देवता मानल्या जातात.

गोमंतकीय लोकांचे तांदुळ – मासळी हे मुख्य अन्न आहे. गोमंतकात पाऊस जास्त प्रमाणात पडत असल्यामुळे उतरल्या छपरांची मंगलुरी कौलांची चुनेरी घरे आहेत.

गोमंतकातील देवस्थानांतून नवरात्र, दसरा, काला व जत्रा हे उत्सव मोठ्या प्रमाणावर होत असत. याशिवाय देवस्थानाच्या परंपरेप्रमाणे इतर उत्सव होतात. जत्रेच्या वेळी मराठी नाटके होत असतात. गोमंतकाचे खानदानी संगीत हिंदुस्थानी संगीतामध्ये मिश्र झाल्यावरही पुथमात्म राहिलेले संगीताचे अवशेष म्हणजे काला, जागर, धाला, पंचवाद्य चौघडा घुमटवाद्य इ. होय. इत्यादीतून सांस्कृतिकतेचे दर्शन घडते. नाताळ हा सण साजरा केला जातो. शांतादुर्गा, शाळीग्राम या कुलदेवतावर श्रध्दा आहे.

## २.१ 'भावीण' –

बा. भ. बोरकरांनी 'भावीण' मधून गोव्यातील लोकजीवन चित्रण केले आहे. गोमंतकीय भौगोलिक आणि सामाजिक पार्श्वभूमीवरील भाविणीच्या आत्मबलिदानाची ही कथा आहे. गोव्यातील भाविणीची समस्या हाच या कादंबरीचा विषय होय.

ऋषी शेवंतीच्या प्रेमाचा धागा, हरिजन उध्दाराचे किंवा मातृभाषेतून शिक्षणाचे केशवकमलाचे कार्य हे धागे गौण ठरतात. भाविणीच्या जीवनचित्रणाप्रमाणे गोमंतकीय लोकजीवनातील विषमता, जातिभेद, श्रेष्ठ – कनिष्ठतेच्या कल्पना, शेटी – बेटी व्यवहारांचे चित्रणही प्रसंगानुरूप येते. खिश्चनांचा धर्मप्रचार, कोकणीला स्वतंत्र भाषेचा दर्जा महात्मा गांधीच्या विचारांचा प्रभाव, व्यसनमुक्ती, मद्यनिर्मितीस मुक्त परवाना, मद्यपान विरोधी चळवळ, सोयरोबा अंबियांच्या अभंगाबद्दल अभिमान आणि गोमंतकीय भाविणींची समस्या यातून 'प्रदेश' गोचर होतो.

केवळ सावर्डे दुर्भाट, पर्तगाळ, मडकई ही गावे, शांतादुर्गा व शाळीग्राम ही कुलदैवते, अघनाशिनी नदी, तांबडी माती, मंगलुरी कौलांची चुनेरी घरे, बंदर, खाडी, वाफर, मॅंडोलिनवर कोकणी गीत गाणारे स्त्री – पुरूष, आंबे, पोकळी, माड, नारळाची हिरवी गर्द झाडी, तसेच 'काचोळीचा लोकसमज श्रध्दा' – परंपरा, लोकगीत – पेणी, पालखीची मिरवणूक आणि दृकप्रत्ययी पात्ररूपाने आलेला निसर्ग यातून प्रदेश साकार होतो. गोव्यातील लोकजीवन वास्तव आणि उपेक्षित भाविणी या सामाजिक संस्थेशी निगडित अशी दुहेरी प्रादेशिकता गोचर होते.

प्रादेशिकता प्रथम जाणवते भाषेमुळे. वाफोर, काचोळी, पेणे करणे, घडावले, रायस, महाजनांची आज्ञा, घाडी लोलादणे. बोलेती इत्यादी शब्दप्रयोग भाषेतील वेगळेपण स्पष्ट करतात. कौल लावणे, मॅंडोलिनच्या सुरांवर गाणी म्हणणे, असल्या कृतींनी वेगळ्या जीवनाची चाहूल लागते. फ्रेंडच्या अनुषंगाने खिश्चन – हिंदू संमिश्रतेचीही जाणीव होते. गोमांतकातील निसर्ग इतर महाराष्ट्रीयांना वेगळा वाटला.तरी दक्षिण कोकणच्या माणसाला वेगळा वाटत नाही.

सावंतवाडी, आंबोली, वेंगुर्ले वगैरेहून वेगळे व चित्ताकर्षक असे चित्र गोमांतकाचे नाही. बा. भ. बोरकरांच्या ललितरम्य शैलीमुळे गोवा चित्रण रम्य झालेले दिसते. "श्रावणांतली सस्यशामलसृष्टी नानावर्णाकृतींच्या पत्री – फुलांनी नटली होती.

अघनाशिनीच्या एका कानावर मासळीसाठी प्रसिध्द असलेले दुर्भाट गांव कोळ्यांच्या लहानमोठ्या घरांचा परिवार मांडून बसले होते.आणि त्यांच्या मध्यभागी खळूकामतांचा वाडत्त आपल्या खानदानी दिमाखांत अतिथ्याची दारे उघडून पालकासारखा उभा होता. समोरच्या प्रशस्त पटांगणांत नारळांच्या राशी पडल्या होत्या" (पृ. ३५)

ह्या कादंबरीच्या प्रादेशिकतेचा कथानक दोन मोठ्या तत्वांशी निगडीत झाला आहे. डॉक्टरने औषध अथवा दुकानदाराने वस्तू द्यावी, इतक्या सहजपणे शेवंती ऋषीला शरीरसुख देते. हे जीवनाचे तत्व वेगळे आहे. तिच्या कृत्याबद्दल विशेष वादविवाद - चर्चाही होत नाहीत. कोणी संतापत नाही, वैतागून जात नाही. एखाद्या पुरूषाने एखाद्या स्त्रीला 'ठेवली' ह्या कल्पनेने हा समाज सभ्यासभ्याचे वर्तन करीत नाही.

उतार वयातला अंताशेठ व फुलवंती ही दोघेही प्रत्यक्षात संबंध नसताना ते आहेत अशा अफवेला खतपाणी घालतात. फ्रेंडची पत्रे व पैसे शेवंती परत करते, हे फुलवंतीला आवडत नाही. तारूण्यात शक्य तेवढे सुख उपभोगावे व वृध्दपणाची तरतूद करावी हे तिचे तत्वज्ञान आहे. 'बामणाचे रक्त तुला व मला छळीत असल्याची' तिची तक्रार आहे. हे सारे जीवन महाराष्ट्राच्या जीवनाहून वेगळे आहे. असल्या चमत्कारिक तत्वज्ञानाचे अस्तित्व अन्य महाराष्ट्रात नाही, हीच यातील प्रादेशिकतेची पृथगात्मता ठरते.

## २.२ 'आमचे गोयं, आमका जाय' -

सुभाष भेंडे यांनी 'आमचे गोयं, आमका जाय' मधून गोमंतकाच्या पार्श्वभूमीवरील स्वातंत्र्य लढ्याची कथा लिहिली आहे. गोमंतकीय लोकजीवनातील विषमता श्रेष्ठ - कनिष्ठतेच्या कल्पना, महात्मा गांधींच्या विचारांचा प्रभाव, मद्यनिर्मितीस मुक्त परवाना आणि गोमंतकीय भाविणीची समस्या यातून प्रदेश गोचर होतो.

हळदाणे – बस्तोडे, डिचोली, उसकाई, पणजी ही गावे, खळनाथ, शाळीग्राम, शांतादुर्गा ही कुलदैवत मांडवी व जुआरी नदी, तांबडी माती, मंगलुरी कौलांची चुनेरी घरे, बंदर, खाडी समुद्रकिनारा लाभला आहे. काजू, फणस, अननस, आंबे, जाम, नारळाची हिरवी गर्द झाडी, कोकम, तसेच शेंसविधी चा लोकसमज श्रध्दा – परंपरा आणि इकप्रत्ययी पात्ररूपाने आलेला निसर्ग यातून प्रदेश साकार होतो.

उदा. "सकाळी सूर्याच्या कोवळ्या किरणात चमकणारे पिवळे धमक काजूचे बोंडू, झाडाला लटकणारे ओबड धोबड रसाळ फणस, तोंडात घातले की विरघळून जाणारे मिठ्ठास अननस, तांबुस –पिवळ्या रंगाचे मानकुराद – फर्नादिन आंबे, डोंगरावरल्या झुडूपात गवसणारी छोटी पांढरी चुन्नां आणि चपटी काळी चारां, छोट्या कांद्याच्या आकाराचे चवदार जाम – उन्हाळ्यात गोव्यातली निसर्ग सृष्टी जणू लेकूरवाळी होई न् चारी अंगी बहरून जाई." (पृ. ३८)

गोव्यातील लोकजीवन वास्तव आणि उपेक्षित भाविणीशी संबंधित आहे.

उदा. "वैकुंठबाबानं आपल्याला म्हापशाला छोटं दुकान काढून दिलं, स्टेनअरी सामानाचं ! आई म्हणते, त्यांचे आपल्यावर डोंगरा एवढे उपकार आहेत, ते जर वडील आहेत तर त्यांनी मुलासाठी जे केलं ते उपकार समजाचे ? मग आईची लाचारी का ? वैकुंठ बाबाची दादागिरी का? त्यांची मुलं त्यांचं नाव लावलात आपण तेवढं आईचं नाव लवायचं ! केव्हाही हक्कानं येतात आणि केणी पोटात रिचवून लास होऊन पडून राहातात ! आपली मात्र थंडीवाऱ्यात सोऱ्यावरल्या बल्कावावर रवानगी !...." (पृ. २१) या कादंबरीत अशी द्विधा प्रादेशिकता गोचर होते.

## ०३. कोकण :

कोकणात ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधूदुर्ग इत्यादी जिल्हांचा समावेश होतो. या प्रदेशाच्या पश्चिमेला अरबी समुद्र आहे, तर पूर्वेला सह्याद्रीच्या पर्वतरांगा आहेत. अरबी समुद्र आणि सह्याद्रीच्या मधील कोकणपट्टी भूमी म्हणून ओळखतात. प्रचंड पाऊस पडूनही येथील लाल मातीच्या शेतीवर त्यांचा उदरनिर्वाह होत नाही.म्हणून मुंबईकडे धावतात. त्यामुळे गावे ओस पडू लागली. रेल्वेमार्गाचा किंवा बंदरनिर्मितीचा अभावामुळे औद्योगिककरण नाही आणि म्हणून रोजगार नाही. प्रचंड दारिद्रयाचा जणू शापच या लोकजीवनाला लाभला आहे. आधुनिक साधन – सुविधा सेवांचा अभाव, विपूल खनिजसंपत्ती असूनही औद्योगिकदृष्टया रत्नागिरी– सिंधुदुर्ग आणि एकूणच कोकण प्रदेश मागासलेला आहे. या प्रदेश वैशिष्टयांचा लोकजीवनावर परिणाम होतो.

कोकणात मुख्यत: महाराष्ट्रीय लोकांची वस्ती आहे. उत्तर कोकणात गुजराती लोक व वारली, कोकणी, कातकरी ठाकर इ. आदिवासी जमाती आहेत. पुर्वी परदेशातून इथे आलेले फारशी, ज्यू, हबशी व अरब यांचे वंशजही अद्यापि कोकणात आढळतात. पारशी लोक व्यापार करून श्रीमंत झाले आहेत. पोर्तुगीज व हबशी यांनी हजारो हिदूंना बाटविल्यामुळे कोकणात खिस्ती व मुसलमान यांची ही वस्ती बरीच आहे. कोकणातील हिंदूच्या चित्पावन (कोकणस्थ), सारस्वत, कऱ्हाडे, देवरूखे, वाणी, लिंगायत, कुणबी, मराठे, भंडारी, गाबित, महार, चांभार, कोळी, खार्वी, माळी, गावडा इत्यादी मुख्य जाती आहेत.

त्यांच्या चालीरीती व संस्कार इतर प्रदेशातील जाती प्रमाणेच आहेत. हे लोक शिव, विष्णु, दुर्गा, गणपती, दत्त या देवताव्यतिरिक्त भैरोबा, भवानी, चंडिका, भूतनाथ, जखमाता, काळकाई, क्षेत्रपॉल,खेमराज, मटाकाळी, पांढर, खळनाथ, वाघजई, मारूती, राम, विठोबा, अंबाबाई, खंडोबा, महालक्ष्मी, म्हाळसा, मंगेश, मागेश, रामनाथ, शांतादुर्गा या देवताना गजतात. वेताळ, समंध, देवचार, मूंजा, खविस, गिऱ्हा, चेटक, झेटिंग, म्हसोबा, जखीव, हडळ, लावसट इ. भुता खतांना मजण्याची प्रथा आहे.

कोकणात शेती व मासेमारी हे मुख्य व्यवसाय चालतात. येथे शेतीसाठी सपाट जमीन त्यामानाने कमी आहे. शिवाय मातीही कमी कसाची आहे. त्यामुळे शेतीतून उत्पन्न कमी मिळते म्हणून बरेचसे लोक व्यवसाय व नोकरी यासाठी मुंबई व अन्य मोठ्या शहरांत जातात. काही लोक काजू, फणस, चिकू, पेरू इत्यादी फळे विकतात. शेळ्या, मेंढ्या पाळणे, वनस्पतींपासून औषधे तयार करणे इत्यादी व्यवसायही करतात. तसेच आंबापोळी, आमरस, काजूगर, कोकम या वस्तूंची विक्री करतात.

कोकणात भरपूर पाऊस पडतो. पावसाचे पाणी झटकन वाहून जावे म्हणून येथील घरे उतरत्या छापरांची असतात. घरासमोर छोटे अंगण असते. डोंगराळ भागातील गावात लहानलहान वाड्या असतात. अनेक वाड्यांचे मिळून एक गाव होते.

कोकणात कडाक्याची थंडी पडत नाही. नेहमी हवामान उष्ण व दमट असते. त्यामुळे येथील लोक कमी कपडे वापरतात. गुडघ्यापर्यंत पंचा, अंगात जाकीट आणि डोकीला रूमाल किंवा टोपी असा शेतमजूरांचा पोशाख असतो. मच्छीमारी करणारे पुरूष कमरेभोवती रूमाल गुंडाळतात किंवा चड्डी घालतात. अंगात कुडते किंवा बंडी व डोक्यावर जाड कपडाची टोपी घालतात. शहरातील स्त्रिया निरनिराळ्या प्रंकारच्या व रंगांच्या साड्या नेसतात. पुरूष शर्ट – पँट घालतात.

कोकणात तांदुळ जास्त पिकतो. सहजिकच येथील लोकांच्या जेवणात मुख्य अन्न म्हणून भात, तांदळाची किंवा नाचणीची भाकरी, आमटी, कडधान्याची उसळी, डाळी, भाजीपाला हे पदार्थ जेवणात असतात. ज्वारीची भाकरी व गव्हाच्या पोळ्या यांचाही जेवणात समावेश असतो. समुद्रकिनारी राहणाऱ्या लोकांच्या जेवणात भात व मासे असतात. कोकणात नारळाचे उत्पन्न जास्त होते. त्यामुळे स्वयंपाकात ओले खोबरे बरेच वापरतात.

गुढीपाडवा, दसरा, दिवाळी, संक्रांत हे सण इतर प्रांताप्रमाणेच कोकणातही साजारे होतात. मात्र नागपंचमी नारळी पौर्णिमा, गौरी – गणपती, गोकुळाष्टामी व शिमगा या उत्सवांना कोकणात विशेष महत्व असते.

उत्सवात आणि जत्राच्या वेळी दशावतारी खेळ होतात. अशा प्रसंगी विविध प्रकारचे नृत्ये केली जातात. त्यातील गौरीचा नाच, राधानृत्य, काठखेळ, शेमट इत्यादी प्रकार विशेष उल्लेखनीय आहे.

कोकणातील खिस्ती लोक म्हणजे बाटलेले हिंदूच असल्यामुळे त्याच्या बऱ्याच चालीरिती हिंदू प्रमाणे आहेत. त्यांच्यातील जातीभेद अजून पूर्वीसारखाच आहे हे लोक चर्चमध्ये जाऊन यशू, मेरी व खिस्ती संत हे त्यांचे वेगळेपण आहे.

कोकणातील मुसलमान शेकडो वर्षापूर्वी इथे येऊन स्थायिक झालेल्या अरबी व इराणी लोकांचे वंशज आहेत. बाकीचे बाटलेले हिंदू असून त्यांच्या चालीरिती बव्हंशी हिंदूच्या सारख्याच आहेत.

## ३.१ 'पडघवली' -

कादंबरीचा 'परिचय' घडवून देताना लेखकाने म्हटले आहे की, "पडघवली ही कादंबरी नव्हे, ते एका नष्ट होऊ घातलेल्या खेड्याचे शब्दचित्र आहे, कारखाने आणि उद्योगधंदे यांचे केंद्रिकरण झाल्यामुळे खेड्यातील नवसर्जनशील मनुष्यसक्तीचे शहरात जे विलिनीकरण होत आहे. ते भयानक आणि विचारी माणासाला चिंतीत करणारे आहे 'पडघवली' या मरगळ आलेल्या खेड्यांची प्रतिनिधी आहे"[७]

गो. नी. दांडेकरांच्या कादंबऱ्यांमधून आलेला निसर्ग आशय आणि अभिव्यक्तीचा एक अपरिहार्य भाग म्हणून आलेला आहे, त्यांनी उत्तर रत्नागिरी जिल्हातील दाभोळपट्टा साहित्यात रेखाटला. पारंपरिक गावगाडा आणि समाजव्यवस्था औद्योगिकीकरणामुळे कोलमडली. खेडी उद्ध्वस्त झाली. समूहभावना नष्ट झाली. वाढत्या आर्थिक गरजा आणि जीवनाकडे भोगवादी दृष्टीने पाहण्याची नवी विचारसरणी हा 'पडघवली' या कादंबरीचा विषय आहे. शिवकाल ते स्वातंत्र्यपूर्व काळापर्यंतच्या केशवभट राघोभट – महादेवच्या तीन पिढ्यांचे चित्रण त्यांनी केले आहे. समूह भावना, उत्सवप्रियता, सांस्कृतिक विशेष, भूप्रदेश आणि निसर्गवर्णन आणि बोलीभाषेच्या वापरातून कोकण प्रदेश गोचर होतो. दंतकथा, लोकगीत आणि सणउत्सवांच्या चित्रणातून सामूहिक सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडते.

कोकणी माणसाची कष्टाळू वृत्ती, घाबरटपणा आणि कोर्टकचऱ्या करण्याची वृत्ती, पाटपाण्यावरून होणारा वाद यातून 'प्रदेश' साकार होतो. कुंभा, किंजळ, साग, हिरडी, पोफळी हे वृक्ष, तगरीची फुले , आमसुलं, साठ, कडवे वाल, गरे अंब्याची आंबोशी तसेच कोकणी बोलीतील लकबी आणि संवादातून प्रदेश दृग्गोचर होतो.

स्वत: गो.नी. दांडेकरांनी गप्पांमध्ये "पडघवली" ही एक श्रेष्ठ कादंबरी आहे याच कारण अस आहे की, "एका खेड्याचं वास्तवचित्रण मी त्यात केलेलं आहे."[४२] असे उद्‌गार काढलेले आहेत.

"पडघवली मध्ये नांदती म्हणजे खरोखरीच नांदवी हो ! समोर अंगण, मागं परसू भोवती नारळीपोफळींच्या बाग. पावसाळ्याचे चार महिने तो अंगणात मांडव नसायचा. एऱ्हवी सताठ महिने अंगणात मांडवाची सावली. कोकणी माणसं हुशार. एका दगडात दोन पाखरं. खाली सावली नि वर वाळवणं, कोकणात वाळवणांचं भरी बंड, पोफळाच्या वेळी पोफळं , झालंच तर आमसुलं, साठं, कडवे वाल, गरे अंब्याची अंबोशी, केळ्याचे काप, मातावलेली कडधान्यं." (पृ. ३३) यातून कोकणातील निसर्ग चित्रण येते.

"माज आलाय सगळ्यांना, चांगलं खातंपितं कोकण बघवेना. जसं अंगावर आलं एकेकाच्या उतले, मातले - माडी घ्यालेल्या कुळवाड्यासारखे. नव्हती भांडणं, ती उकरून काढली, जुनी वैरांची भुतं धूप घालून पुन्हा जागती केली. वादले मारामाऱ्या केल्या. कोर्ट झाली, कचेऱ्या झाल्या अगदी हायकोडताचे उंबरे सुध्दा झिजवले मेल्यांनी, नि आता गावचा मसणवाटा करून पांगलेत चहू दिशांनी वाऱ्यावर" (पृ. ३३) यातून कोकणी माणसाचे कार्टकचऱ्या करण्याची वृत्ती पाटपाण्यावरून होणारा वाद इत्यादी व्यक्तिस्वभावाचे गुणदोष दिसतात.

"राधूकाका, तो तुमचां सवलां तुमच्या बासनांत ऱ्हाऊं द्या ! म्हंतांव तर खारीत ऱ्हाय ऱ्हेत, प र पऱ्ह्यात पर ऱ्हेनार या तिगांना" (पृ. २१) यातून कोकणी भाषेचा प्रत्यय येतो. निसर्गवर्णन, व्यक्तिदर्शन, कोकणी भाषाचा (ग्रामीण) प्रयोग या दृष्टीने ही कादंबरी एक श्रेष्ठ प्रादेशिक कादंबरी ठरते.

## ३.२ 'इंधन' :

हमीद दलवाई यांच्या 'इंधन' चा परिवर्तन काळातील हिंदू – मुस्लिम – नवबैध्दांचा सूडसंघर्षाचे चित्रण करणे हा उद्देश आहे. या संघर्षात कुळकायदा निमित्त झाला आणि पारंपरिक गावगाडा मोडकळीस आला. एकोप्याची – विश्वास – प्रेमाची भावना नष्ट झाली, संशय – अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले. मुस्लिम खोत इसाकमास्तर आणि हिंदू सुमती किंवा केपटाऊनवाला इसाक आणि नवबौध्द लक्ष्मी यांच्या अनैतिक संबंधामुळे गावात सूडभावना वाढीला लागली आणि हिंदूनी पालखीची सवाद्य मिरवणूक मशिदीजवळून नेल्याने भडका उडतो.

मुस्लिम पालखीवर हल्ला करतात. स्त्रियांवर बलात्कार करतात. असे संघर्ष होतील आणि परत लोक एकत्र येतील असा आशावाद लेखक व्यक्त करतो. या संदर्भात भास्कर शेळके लिहितात, "विषयांतर्गत मर्यादेमुळे प्रादेशिकता धूसर झाली आहे. याचे कारण कादंबरीच्या विषयातच शोधावे लागते"[३] कुळकायद्यामुळे खेड्यात निर्माण झालेली अविश्वासाची भावना किंवा मुस्लिमांचे पाकिस्त्तानधार्जिणे वर्तन अन्य प्रदेशातही दिसते. तरीही काही घटना प्रसंगातून 'प्रदेश' स्पष्ट होतो.

कोकणातील चिपळूण जवळील वणेगाव वाशिष्ठी नदी, तिच्यातील विशिष्ट प्रकारचा म्हावरा मासा, मासेमारी, भातशेती, समुद्राची भरती, वीज, रस्ते नसलेला मागासलेला प्रदेश, कुजल्यांचे –दारिद्रय, गवताने शाकारलेली घरे तर मुस्लिम श्वोतांची मंगलोरी कौलांची घरे, परिट, न्हावी हे बलुतेदार आणि ऋतुचक्र दिनचक्राप्रमाणे रंग बदलणारा लोकजीवनावर परिणाम करणाऱ्या निसर्ग वर्णनातून तसेच कोकणी बोलीच्या ढंगाने हिंदीतील शब्दाचा केलेला वापर आणि बोलीतील शब्द यातून प्रदेश साकार होतो.

"वाशिष्ठीला धनुष्यासारख्या वाकवणाऱ्या डोंगरावर सकाळीच पावसाच्या धारांची शुभ्र चादर पसरली जाईल. नदीच्या भरतीच्या पाण्यावर पावसाच्या सरींच्या लाटा उठू लागतील. आकाशातील धूळ पावसाच्या पाण्याबरोबर खाली येईल.

पाण्यात वितळून जाईल झाडेझुडपे कात टाकल्याप्रमाणे हिरवीगार दिसू लागतील. ओल्या होणाऱ्या जमिनीतून काही वेळा पाण्याची वाफ निघत राहील. मग जमीनच थंड होईल. सावकाश हवेत गारवा येईल. रोज असा पाऊस कोसळू लागेल. सगळा तळ हिरवागार दिसू लागेल. वालांचे मोड टिपण्यासाठी शेतात माणसे फिरू लागतील" (पृ. १५१) या वर्णनातून कोकणातील निसर्गाचे दृश्यरूप चित्रण आले. "वालेकुम सलाम, ये ये, बस" बाबा म्हणाले तो पडवीतल्या फलाटावर बसला आणि माझ्याकडे वळून म्हणाला, "काय रे, जुम्माच्या नमाजेला नाय आयलोस ?" या वर्णनातून कोकणी बोलीच्या ढंगाने हिंदीतील शब्दांचा वापर केला आहे. म्हणी वाक्प्रचारातून प्रदेश साकर केला आहे. 'इंधन' सूडभावनेचे प्रतीक आहे. त्या संघर्षास कोकणी प्रदेशाची पार्श्वभूमी लाभली आहे.

## ०४. पश्चिम महाराष्ट्र :

### ४.१ बनगरवाडी :

व्यंकटेश माडगुळकरांच्या १९५५ मध्ये प्रसिध्द झालेल्या 'बनगरवाडी' या कादंबरीत अवर्षणग्रस्त माणदेशातील धनगरांचे जीवनचित्रण आलेले आहे. हा प्रदेश कमी पावसाचा आणि निकृष्ट जमिनीचा आहे. धनगरांचे जीवनचित्रण करताना हा प्रदेश चित्रित झाला आहे.

दशम्यांचे पेंडके घेऊन राजाराम सौदणीकर मास्तर माळरानावर वसलेल्या उजाड वाडीत येतो. गावच्या धनगरांच्या पोरांना शिकविण्याचा प्रयत्न करतो आणि त्याबरोबर धनगरांच्या जीवनाशी समरस होतो. दुष्काळामुळे जगण्यासाठी मेंढरांबरोबर गाव सोडून लोक परगावी जातात. मास्तरही 'बनगरवाडी' सोडून परत जातो. लेखकाच्या स्वानुभवाचा हा प्रदेश आहे. एवढेच कथानक आहे. श्री. कृ. ब. निकुम्ब यांनी म्हटल्याप्रमाणे "बनगरवाडीत ठसठसीत माणदेशाचे दर्शन घडते... वस्ती मर्यादित तरी असंख्य व्यक्तींची खूण सांगणारी आहे. तिथल्या भाषेला वेगळा घाट असला तरी माणदेशाच्या भाषेपेक्षा तो संपूर्णपणे वेगळा वाटणारा नाही....बनगरवाडी ह्या प्रदेश व्यक्तीचे दर्शन घडविणे हाच या कथानकाचा हेतू आहे"[०४]

माणनदी काठच्या माणदेशातील विटेआटपाडी या औंध संस्थानातील पतसरकारच्या राजवटीतील अवर्षणग्रस्त प्रदेशातील 'धनगरवाडी' तील उपेक्षित धनगरांचे स्वातंत्र्यपूर्व काळातील खडतर लोकजीवनाचे चित्रण लेखकाने केले आहे. उजाड माळरान बाभभीची झाडे, मुरमाट्यावरील हिरवे भुंगे, तरवड – नेपती, बोंराटीची झुडपे, टोळ सरडे, कीटक, मुंग्या, गुंडीकिडे, घोरपड, बेडूक, कावळे, साळुंक्या, चिमण्या, वाणी आणि तांबडी राने, हुलगे, तूर, मटकी, ज्वारी, करडई, हरबरा इ. पिके, धनगरांच्या लोकजीवनावर परिणाम करणारे उन्हाळा, पावसाळा, हिवाळा हे ऋतुचक्र आणि "जिराइतातील बाजरी हळूहळू वाढली. पोटरीतून लांब दांड्यांची शेलाटी कणसे बाहेर पडली. हिरव्या ताटांवर तपकिरी रंगाचे कणसे सर्वत्र डुलू लागली आणि लवकरच जांभळ्या फुलोऱ्यांनी फुलून गेली, तो नाजूक फुलोरा डवरला आणि लहान मुंग्या कणसांवर चढू लागल्या. मधमाशा कणसांभोवती फिरू लागल्या. पिवळ्या रंगाची लहान फुलपाखरे जोडीजोडीने तरंगत येऊन बसू लागली, कधी धिंगाणा घालणाऱ्या वाऱ्यावर फुलोरा उडू लागला आणि कसणे उघडी पडू लागली. बाजरीच्या बरोबरीने आत टाकलेले कडधान्याचे वेल पसरूं लागले, मटकीच्या शेंगांचे झूपके कुठेकुठे दिसू लागले. हुलग्याला जोम आला. तुरीच्या उभार झाडांवर सावळ्या शेंगा दाण्यांनी भरू लागल्या भुईमुगाच्या मुळया अंडी धरू लागल्या. आणि लवकरच फुलोऱ्यांनी उतरलेली कणसे बाजरीच्या चमकदार दाण्यांनी टवटवली. चिवळांचे थवे भरारत येऊन ते दुधाने भरलेले दाणे खाऊ लागले" (पृ. ५७)

निरक्षरता, अज्ञान, दारिद्रय असून औंध संस्थानच्या 'पंतसरकार' या राजाबद्दलच्या आदरातूनही प्रादेशिकता दृगोचर होते, त्यांचे सण, उत्सव, लोककथा, रूढी, परंपरा, माऊली आईवरील श्रध्दा, गावपंचायतीने भांडण मिटविण्याची किंवा न्यायदानासाठी धनगरांचे महादैवत बोलविणे, सामुदायिक विवाह पध्दती, नवीन मेंडक्याला बेण्यासाठी शेलक मेंढरू देणे या सर्वामधून प्रदेश निवडता येतो. या सर्वावरून 'बनगरवाडी' चा आत्माच प्रादेशिक असल्याचे स्पष्ट होते.

तिला राबवून घेतली तरच पैसा... इंग्रजी खतं भरपूर घातली, ट्रॅक्टरचा वापर केला तरच ह्याच रानात पन्नास हजाराचं पीक दरसाल येईल" (पृ. ३) या पाहुण्याच्या विचारांनी गडबडलेला मालक ट्रॅक्टर घेण्यासाठी गुरे, ढोरे, बकऱ्या इत्यादींची विल्हेवाट लावतो. तर दुसरीकडे नारबासारख्या जनावरांवर प्रेम करणाऱ्या व ज़ीवन शेतीला वाहून घेतलेल्या नोकराला हा गोतावळा निघून जावा असे वाटते नाही. गोतावळात घडते ते ऐवढेच, पण त्यातून एक वस्तुनिष्ठ चित्र साकारने ते म्हणजे हरितक्रांतीच्या पाठोपाठ जुन्या शेतकी तंत्राचे उच्चाटन होत आहे. यांत्रिक शेतीचे मुळ धरू पहात आहे. सजीव - निर्जीवांवर त्याचा परिणाम होऊ पहात आहे. नारबावर - तत्सम प्रवृत्तीच्या समष्टी जीवनावर त्याचे झालेले परिणाम एवढाच कादंबरीचा विषय आहे. गोतावळा ही समूहाची कथा आहे. रामू सोनवडा, नारबा, सित्या, शिवलिंग - महालिंग, सोन्या- चाण्णा, नाम्या, वाह्या, चंपी, मारूत्या, राजा इत्यादी माणसे व प्राणी यांच्या परस्पर संबंधाने गोतावळा हे समूहगान आहे. एका अर्थाने मानवी संबंधाची जपणूक करणाऱ्या नारबाची ही आत्मकथा आहे.

प्रादेशिकतेच्या दृष्टीने विषयांतर्गत मर्यादा आहेत याचे कारण कादंबरीच्या विषयातच मिळते. कृषि संकृतीच्या ऱ्हासाला बळी पडलेले नारबासारखे सालगडी अन्य प्रदेशांत आहेत यंत्रयुगाच्या प्रभावाने मानव आणि निसर्गाच्या संबंधांवर आघात होऊन शेतमजूरांची आणि बलुतेदारांची कशी वाताहत होते, हे सांगण्याच्या उद्देशाने या कारणांनी लेखन झाले आहे.

कोल्हापूर जीवनचित्रण, भू - प्रदेश, निसर्गाच्या वर्णनातून तसेच बोलीभाषा आणि संस्कृती विशेषांतून प्रदेश टिपता येतो.

कागल - कोल्हापूर परिसरातील एक खेडेगाव लेखकाने चित्रित केले आहे. ऊस, ज्वारी, तुर, भात हे पिके, दोडके, वांगी, वाळकं, भेंड्या हे माळव, लिळिंबाची झुडपं घाणीरड, करंजी, उंबर, चिंच, पिंपळ इत्यादी वृक्ष आणि घुबड, कोल्ही, वांदर, मुंगूस, चित्तुर, मोर, टिटवी, हे पशुपक्षी तसेच माळरान, डोंगर, तळे नदी वाझ ढग, दुष्काळ आणि ऋतुचक्राप्रमाणे रंग बदलणारा प्रतीकात्मक निसर्ग व्यक्तीच्या मानसिकतेनुरूप पात्रातून आला आहे.

"बायकू असती तर तिनं तेल तरी मारवलं असतं नि अंग रगडलं असतं. रातभर इस्वाटा मिळाला असता, अन थंड झालं असंत ..... ढोरासारखं ढोर, त्येला ते नुसतं पोटाला घालून भागत न्हाई.... पाडीला पाडा केलाय कशाला ? त्यो का नुसती माणसाची औतंच वडाय जल्माला आलेला असतोय ? " (पृ. १४)

अस्सल कोल्हापुरी बोलीतील शब्दवैभवामुळे 'प्रदेश' टिपता येतो. या संदर्भात प्रभाकर पाध्ये म्हणतात, "या कादंबरीतील वर्णन हे नारबाचे आत्मकथनच आहे आणि ते त्याच्या भाषेत म्हणजे कोल्हापूरकडील ग्रामीण बोलीत आहे. तेव्हा अर्थात ही कादंबरी प्रादेशिकच"[४५] म्हणून मराठी कादंबरी वाङ्मयात नवा प्रवाह निर्माण करणारी वैशिष्ट्यपूर्ण प्रादेशिक कादंबरी म्हणून 'गोतावळा' सर्वोत्कृष्टच आहे यात संशय नाही.

## ०५. विदर्भ :

विदर्भामध्ये बुलढाणा, अमरावती, अकोला, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, चंद्रापूर, गडाचिरोली या नऊ जिल्हांतील प्रादेशिक वैशिष्ट्यांचा विचार अभिप्रेत आहे. हा प्रदेश डोंगराळ, मागासलेला, औद्योगिकीकरणापासून वंचित असलेला, शैक्षणिक जागृती न झालेला आहे. तसेच यातील काही जिल्हे पूर्णपणे अदिवासी वस्ती असलेले आहेत. 'कापूस' हे या प्रदेशातील मुख्य पीक आहे. तसेच मोसंबी – संत्र्यांच्या बागा या प्रदेशात आहेत. तरीही बहुजन समाज दारिद्रयरेषेखालील जीवन जगतो.

सह्याद्री पर्वताच्या भागात महादेव कोळी, वारली, ठाकर, कातकरी इत्यादी लोकांची वस्ती आहे. सातपुडा पर्वताच्या रांगांमध्ये भिल्ल, गावीत, दुबळा, कोरकू, धानका, भावची इत्यादी लोकांची वस्ती आहे. विदर्भातील डोंगराळ भागात गोंड माडिया गोंड, कोरकू, कोलाम, परधान, आंध हे लोक हे सर्व अदिवासी म्हणून ओळखले जातात.

येथील आदिवासी लोकांची वस्ती म्हणजे घरांचे छोटे – छोटे समूह असतात. त्यांच्या वस्त्यांना पाडा, पौडा, टोला किंवा झाप म्हणतात. त्यांचे घर म्हणजे साधी लहान झोपडी असते. ती बहुधा वनात मिळणारे लाकुड, बांबू व गवत यांपासून बांधलेली असते. घराच्या भिंती शेणामातीने सारवलेल्या असतात. छप्पर गवत व पाने यांनी शाकारलेले असते. काही घरांना जोडूनच गुरांचा गोठाही असतो. ते गाई, म्हशी, बैल व कोंबड्या पाळतात. त्यांच्या घराच्या आजूबाजूला मोकळी जागा असते. तिला वाडा किंवा वाडगा म्हणतात. पावसाळ्यात ते या मोकळ्या जागेत भोपळा, दुधी, काकडी, दोडका,कारली, यासारखी भाजीपाला काढतात.

शेती हा, यांचा मुख्य व्यवसाय आहे. अदिवासींमध्ये शेतमजूरांची संख्या बरीच आहे. त्यांची शेती डोंगर– उतारावर असते. काही भागात सखल प्रदेशातही अदिवासी लोक शेती करतात. भात, नाचणी, वरी, ज्वारी, गहू, तूर, कापूस, बाल, भुईमुग इत्यादी धान्य पिकवतात. लाकुडतोड, लाकूड, वाहतुक, वनातील वस्तू गोळा करणे हे त्यांचे आणखी काही व्यवसाय आहेत.

होळी, नागपंचमी, दिपावली हे सण साजरे होतात. येथील लोकांची स्थानिक देवदेवतांवर श्रध्दा आहे. येथील आदिवासी समाजाची वेगळीच अशी संस्कृती आहे. त्यांच्या वेगळेपणाचे दर्शन होळीउत्सावातून दिसते. नागदेव, सुर्य, चंद्र इत्यादी चे पूजा करतात. ते इतर लोकांप्रमाणे महादेव किंवा देवीची पूजा करत नाही. इत्यादीतून सांस्कृतिकतेचे दर्शन घडते.

## ५.१ 'धग'

उध्दव शेळके यांनी 'धग' मध्ये वऱ्हाडी लोकजीवनाचे चित्रण केले आहे. शिंपी समाजातील कष्टाळू जिद्दी कौतिकच्या संसाराची परवड येथे लेखकाने चित्रित केली आहे. या संदर्भात वासुदेव मुलाटे म्हणतात,

"या कांदबरीत शहर विरूध्द खेडे असा संघर्ष येत नाही. तरीही यंत्रयुगाने खेड्यांवर होणाऱ्या परिणामाचे ग्रामीण विभागातील सर्वसामान्यांच्या जीवनावर होणाऱ्या शोकात्म परिणामाचे तरल परंतु प्रभावी चित्रण येथे लेखकाने केले आहे, कौतिकच्या संसाराची झालेली दैना म्हणजे विषम समाजव्यवस्थेचे नागडेपण क्रुर आणि हिंस्त्रकरणाऱ्या यांत्रिक – औद्योगिक समाज व्यवस्थेत कष्टकरी ग्रामीण समाजावर केलेल्या अतिक्रमणाचेच प्रतिनिधिक स्वरूपातील चित्रण आहे'[१६]

या गावगाड्यातील जिव्हाळा – प्रेमळपणा नष्ट होत असल्याची समस्याही लेखकाने चित्रित केली आहे. समान आर्थिक स्तरावरील हिंदू – मुस्लिम ऐक्य, विषमता, जातिभेद, वैदर्भीय माणसाचा दिलदारपणा नष्ट होत असल्याची समस्याची लेखकाने घटनाप्रसंगांतून आणि सामान्य माणसाच्या कृति – उक्तीतून प्रकट केला आहे. स्वातंत्र्यपूर्ण काळातील लोकजीवन प्रस्तुत कादंबरीत चित्रित झाले आहे. महारोग झालेला महादेव मिशनऱ्यांबरोबर निघून जातो. यातून इंग्रजांच्या राजवटीचा काळ सूचित होतो. येथे कांदबरीकाराने निवडलेल्या विषयालाच काही अंगभूत मर्यादा असल्याने संपूर्ण प्रादेशिकता येऊ शकली नाही.

शिंपी या पारंपरिक व्यावसायिकाची समस्या अन्य कादंबरीतील प्रादेशिकता ही जाती जमातीच्या जीवनाशी निगडीत आहे. याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. तसेच काही घटना –प्रसंगांतून वैदर्भीय 'प्रदेश' निवडता येतो. उदा. "काही वेळानं हिंगण घाटावरून सुटलेली गाडी वर्धेस थांबली. कौतिकनं नामाला जागं केलं, तो आजूबाजूस पाहू लागला. चारी बाजूंनी दिव्यांचा लखलखाट होता" (पृ. ९)

वर्धा, अमरावती ह्या विदर्भातील जिल्हांची भौगोलिक पार्श्वभूमी कथानकास लाभली आहे. या प्रदेशातील हिंगणघाट, तळेगांव ठाकूर, मोझरी, चांदूर, तळणी, संदुर्जने, तिवसे, शेंदांळे, फौडण्यपूर आणि सालबर्डी या खेड्यांची पार्श्वभूमी येथे आली आहे. वैदर्भीय माणसांचा दिलदारपणा आणि मागासलेपणा, आर्थिक स्तर लेखकाने चित्रित केला आहे.

कुडा – मातीची घरे, जवस, तूर, तीळ, मुग, कापूस, जोंधळा ही पिके, हिवरबाभळ, गोन्नीचे झुडपं, आंबा, चिंच, कौठ, रणरणता दाहक उन्हाळा, सपाट माळरानाचा प्रदेश, सोसाट्याचा वारा, स्थानिक देवदेवतांवरील महादेव – सादुलबुआवर हिंदू – मुस्लिमांची श्रध्दा, "जातं काय मंजे ? नाई गेली त कोन घालनार आये मले कमाई करून ...... इस्वरानं त बरंच बरं केलं कररसीन रांडेत खासीन, नाई त उपासी शयसीन ....." (पृ. २३९) या संवादासाठी वापरलेली वऱ्हाडी बोली, म्हणी, वाक्प्रचार, प्रतिमादीतून प्रदेश साकार होतो. प्रादेशिकतेचा प्रवाह समृध्द करणारी 'धग' ही वैशिष्टपूर्ण कादंबरी आहे.

## ५.२ झेलझपाट

मधुकर वाकोडे यांना 'झेलझपाट' मधून तारूबांधातील कोरकु अदिवासींच्या जीवनाची परवड रेखाटली आहे. सरकारी अधिकारी कायदे आणि व्यापारी यांच्यामुळे कोरकुची पारंपरिक नैसर्गिक जीवनशैली नष्ट होत आहे. अमरावती– परतवाडा मेळघाट परिसरातील कोरकु आदिवासी या जनजातीशी निगडीत प्रदेश विशिष्ट कादंबरी आहे. कोरकू समाजातील केरू – फुलयच्या असफल प्रीतीची ही शोकांतिका आहे.

कोरकुंच्या समाजजीवनाचे आणि जीवनपध्दतीचे दर्शनही लेखकाने घडविले आहे. मोहफुले – लाकुड फाटा विकून, मच्छीमार करून उदरनिर्वाह करणाऱ्या, मोहाची दारू पिऊन सण – उत्सवाला नृत्य करतात. "कोरकू ढाणा आजा होळी सण असल्यामुळे झोपणार नव्हता. चंद्राला साक्षी ठेवून नृत्य मदिरत ते धुंदफूंद होणार होते, जेवणरातीला काही उत्साही म्हाताऱ्यांनी ढोल काढले....... हातातल्या चोपांनी पानांतून ते सूर काढू लागले. काहींनी पिलमपोण्यावर पिरिंग निरिंग ची धंडली. डांगा डांगावरून खाली उतरलेल्या साळुंक्यांनी पाऊलनक्षी उठवावी त्याप्रमाणे झोपड्या झोपड्यातून आलेल्या बायांनी आपली पावलं चंद्रसाक्षीनं धुळीत मळविली. ठप्पी वाजवीत पोरींनी सूर धरला, फेरावर गाण्याचा पदर पकडून बायांनी सूर लावला " (पृ. ४८)

जातीयेतेच्या परंपरांचे पालन करणाऱ्या आदिवासींची पारंपरिक जीवनशैली नष्ट झाली. टायगर प्रोजेक्ट सहकारी संध्यांमधील भ्रष्टाचार, नारंगी – मोसंबी दारू लालपरी यामुळे कोरकू जात नष्ट होण्याची भीती लेखक व्यक्त करतो. शासनाने आदिवासीचे जीवनमान सुधारण्यासाठी आणि त्यांना समाजविकासाच्या प्रवाहात सामील करण्यासाठी नवनवीन योजना जाहीर केल्या, त्यातून नव्या समस्या न झाल्यामुळे कोरकूंच्या मुलांना शिक्षण घेता येत नाही. प्राण्यांना अभय आणि माणसांना भय, कुटुंबनियोजनाची सक्ती, पुर्नवसन यामुळे ताल नसलेले बेताल जीवन असंघटित कोरकु जगतात. कोरकुंचे सांस्कृतिक वेगळेपणाचे दर्शन होलीकोत्सव फागवा मागणे, नागदेवांची पूजा, त्यांच्या लोककथा लोकगीतातून घडते. ते अन्य लोकांप्रमाणे महादेव किंवा देवीची पूजा करीत नाही. याप्रमाणे कोरकु जनजातीच्या लोकजीवनातील प्रादेशिकता येथे इगोचर होते.

एकझिरा ते सलोन्याला जाणाऱ्या रस्त्यांवरील तारूबांद्याच्या कोरकूठाण्याची पार्श्वभूमी येथे चित्रित झाली आहे. डोंगररांगा, सीपना नदी, लाल माती, कोदो – सवा, कुटकी ही गवती धान्ये, साळी – ज्वारी ही अन्य पिके, अस्वल, डुक्कर, वाघ हे वन्य प्राणी, मोह, पळस, संकेसर, शिंदी, बास, साग, मकई, चारोळी हे वृक्ष, सागाची पान – गवताचे शाकारलेल्या कडीकोंड्या कुलपाचा संबंध नसलेल्या झोपड्या, प्राथमिक स्तरावरील जीवन, शिवाय संवादासाठी वापरलेली घटनाप्रसंग जिवंत करणारी कोरकु भाषा. उदा. "आम शिड्रू नुनू बाकी च्युज ? पितोस काय ? आमच्याबरोबर हा.. अरं.. जांगडी ! इंज आमा साथो शिड्रू नुनू बा " (पृ. ७)

तसेच अन्य लोकांशी बोलताना कोरकुंनी वापरलेली रांगडी हिंदी भाषा, कोरकू लोकगीत आणि प्रतिमांतून प्रदेश सिध्द होतो.

## ०६. मराठवाडा :

मराठवाडात औरंगाबाद, जालना, परभणी, बीड, हिंगोली, उस्मानाबाद, लातूर, नांदेड, या जिल्ह्याचा समावेश होतो. हा प्रदेश तसा सपाट काळ्या कसदार जमिनीचा आहे. गोदावरी नदीच्या काठचा सखल प्रदेश आहे. परंतु सततच्या दुष्काळी परिस्थितीमुळे नगदी पिकांऐवजी त्यांना ज्वारी – बाजरीवरच अवलंबून रहावे लागते.

मराठवाड्यातील समाज मागासलेला दिसतो.ही संताची भूमी आहे. येथील लोक पंढरपूरच्या विठ्ठलाचे वारकरी आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात येथे रझाकारांची जुलमी, अत्याचारी राजवट होती. त्यामुळे येथील लोकांची मनोवृत्ती सोशिक असलेली दिसते. हिंदीचा प्रभावही त्यांच्या बोलीभाषेवर असलेला दिसतो. शैक्षणिदृष्ट्या हा प्रदेश मागासलेला आहे. सरंजामशाही आणि धनिकांचा मुजोरपणा ही या प्रदेशामध्ये प्रकर्षाने जाणवणारा भाग आहे. तसेच उपजीविकेसाठी पुरेशी जमीन प्रत्येकाकडे असल्याने शेतमजुरांची संख्या अत्यल्प आहे.

मराठवाड्यात दसरा, गुढीपाडवा, होळी, दिवाळी, पोळा, संक्रांत, एकादशी हे सण साजरे केले जातात. येथील लोक पंढरपूर विठ्ठलाचे भक्त आहे. म्हसोबा, बिरोबा, माऊली आई या ग्रामदैवतांवर श्रध्दा आहे. काही उत्सवाप्रसंगी भजन, कीर्तन, नृत्य करतात. इत्यादी सांस्कृतिकतेचे दर्शन घडते.

### ६.१ 'पाचोळा'

रा. रं. बोराडे यांनी 'पाचोळा' मधून परिवर्तन काळात पारंपरिक गावगाडा उद्‌ध्वस्त होत असल्याची वेदना चित्रित केली आहे. या संदर्भात भास्कर चंदनशीव म्हणतात, "रा.रं. बोराडे यांनी या कादंबरीला पूर्णत: मराठवाडी बोलीचे रूप प्राप्त करून दिलेले आहे. ती बोली अत्यंत सहजसुलभ, एका सामान्य स्त्रीच्या मुखातून आत्मनिवेदनाच्या पध्दतीने साकारलेली आहे. हे निवेदनकौशल्यही या कादंबरीच्या यशस्वितेतील एक महत्वाचे अंग आहे"[७७] लातूर बार्शी या मराठवाडा प्रदेशातील एका खेड्यातील शिंपी कुटुंबाची ही शोकांतिका आहे.

हेकेखोर, स्वाभिमानी अर्धकुशल कारागीर गंगाराम आणि त्याची समजदार सोशिक बायको पार्वती, मुलगा भाना आणि मुलगी तान्ही यांच्या जीवनातील ताण - तणाव लेखकाने समर्थपणे मराठवाडी किंवा लातूर - उस्मानाबादी बोलीतून रेखाटलेले आहेत. स्वभावजन्य शोकांतिका असली तरीही जनजातीचे जीवनचित्रण करणारी प्रादेशिक कादंबरी आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

एकच एक पारंपरिक बैठा व्यवसाय करण्याची सवय लागलेल्या अर्धकुशल कारागिरांना अन्य व्यवसाय करणे अशक्य होते. त्यातून आर्थिक कोंडी होऊन ताण - समस्या निर्माण होते. धनिकांशी लढा देण्याचा प्रयत्न करणे त्यांना न परवडणारे असते. परिवर्तन काळात आधुनिकतेला, पैसा आणि उपयोगितावादाला अधिक महत्व प्राप्त झाले. प्रेम, जिव्हाळा नष्ट झाला. धंदेवाईक वृत्ती वाढली. त्यातूनही ताण निर्माण झाल्याचे लेखकाने येथे चित्रित केले आहे.

अस्मिता जपण्याचा प्रयत्न करणाऱ्या गंगाराम शिंप्याचा बळी जातो. बोलीतील निवेदन - संवादांनी घटनाप्रसंगाना दृश्यरूप लाभते. उदा. "बगा बरं. किती खऊट हाय गरड. दुसरा एकादा असता तर आला असता तडातडा, आसं का पोराला बोल्लावा म्हणून बसला असता भांडत. पर गरडाची तऱ्हाच न्यारी. पोटात गाठ ठिवून ऱ्हातो बसून. ते पोरटं तसलंच, एकाचे दोन करून सांगितले बापाला आधीच तारं न् त्येत गेलं वारं, म्या बसले चितागती " (पृ. ५) तसेच हेल - लकबी म्हणी, वाक्‌प्रचार, उपमा, यातून प्रदेश निवडता येतो.

'पाचोळ्या' ची जन्मकथा सांगताना लेखक सांगतात, "जिचे संपूर्ण लेखन ग्रामीण बोलीत आहे अशी कादंबरी मराठीत तरी माझ्या वाचनात आली नव्हती त्या दृष्टीने हा मराठी कादंबरीतील पहिलाच प्रयत्न ठरणार होता'[४] सामान्य दुबळी माणसं जराशाही वावटळीने 'पाचोळ्यावाणी' उडून जातील हे सांगण्यात बोराडे यांना पुरेसे यश मिळालेले आहे.

या कथेतून श्रम जीवनावर झालेला शहरी आक्रमण व त्यामुळे ग्रामीण जीवनात निर्माण होणारा ताण लेखकाने सूचकपणे व्यक्त केला आहे. बोल भाषेचा संपूर्ण कादंबरीत वापर आणि आर्थिक समस्या व संघर्ष यामुळे ही कादंबरी प्रादेशिक ठरते.

## ६.२ विषवृक्षाच्या मुळ्या

वासुदेव मुलाटे यांनी 'विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबरीतून 'भ्रष्टाचाराने पोखरलेले सहकार क्षेत्र' साकारले आहे. त्याला बीड – परभणी जिल्ह्यांची पार्श्वभूमी लाभली आहे. संपूर्ण प्रादेशिकता येथे येऊ शकली नाही. याचे कारण कादंबरीच्या विषयातच शोधावे लागते. कारण महाराष्ट्राच्या अन्य प्रदेशातील सहकार क्षेत्र भष्ट्राचाराने पोखरले आहे. याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. तरीही मराठवाड्यातील जनतेच्या मागासलेपणाचाअज्ञानाचा पुढारी – सरकारी कर्मचारी फायदा घेतात.याकडे दुर्लक्ष करून चालत नाही. नव्हे त्यातूनच प्रादेशिकता गोचर होते.

वाशिलेबाजी, मनमानी कारभार, पुढाऱ्यांची अरेरावी, अनिर्बंध वर्तन, नोकरदारांचा मिधेपणा, लाचारी, प्रवाहात सामील होण्याच्या वृत्तीवर लेखकाने प्रकाशझोत टाकला आहे. सहकारात नोकरी करणाऱ्या संवेदनाक्षम विश्वनाथ तरट्यांचा कोंडमारा लेखकाने येथे चित्रित केला आहे. सुट्यासुट्या घटनाप्रसंगातून, माणसांच्या कृतिउक्तीतून प्रदेश टिपता येतो.

परभणी जिल्हातील टाकळी, मानवत, सेलू, कलमनुरी तर बीड जिल्हातील खेर्डा, माजलगांव, खानापूर, गेवराई, पांढरवाडी खेड्यांतील स्वानुभवच लेखकाने चित्रित केला आहे. सपाट उजाड माळरान किंवा काही ठिकाणची काळी जमीन जीव घेणारा दाहक उन्हाळा, ज्वारी, मिरची, कांदे, लसूण ही पिके आणि पात्रांच्या मानसिकतेनुरूप आलेला निसर्ग, पत्र्या – धाब्याची, मातीच्या कच्या विटांची, किंवा दगड गोट्यांच्या भिंती असलेली घरे, यातून मागासलेपण स्पष्ट होते.

कर्जबाजारी, अगतिक, लाचार, दरिद्री लोकांचे सावकारांकडून होणारे शोषण तसेच सरकारी वसुली अधिकाऱ्यांकडून गरिबांची होणारी पिळवणूक यातून हा प्रदेश सिध्द होतो. निवेदनासाठी जरी प्रमाण भाषेचा वापर केला असला तरी संवादासाठी पात्रानुरूप प्रमाण किंवा बोली भाषेचा वापर केला आहे. उदा. "विराप्पा, हे आपले दंडेसाहेब आणि त्या समोरच्या लिंगप्पाचं एवढं काय चालतं रे ? सारखा तो त्यांच्या कडे येत असतो. हे ही तिथं जातात."

"सायेब, तुमच्या ध्यानात यायचं न्हायी"

"का रे बाबा, कशावरून म्हणतोस ? "

"त्याचं असं हाय बगा, आपले देशपांडे सायब जातेत सुसायटीवर वसुलीला. लोकांकडं नस्तो पैसे घ्यायला. ते चेअरमनला म्हन्त्येत चेरमनसायेब, येवढी बारं निभवायचं बगा, नवं - जूनं करा, चेरमन काय करतो ?" (पृ. ५६-५७) म्हणी, वाक्प्रचारातून प्रदेश गोचर होतो. प्रदेश चित्रण करणे हा लेखकाचा उद्देश नाही. केवळ संवेदनाक्षम माणसाचा सहकार क्षेत्रात होणारा कोंडमारा आणि भ्रष्टाचाराने पोखरलेले सहकार क्षेत्र रेखाटणे हाच लेखकाचा उद्देश आहे.

## ०७. समारोप :

बा. भ. बोरकरांनी 'भावीण' मधून गोव्यातील लोकजीवन चित्रण केले आहे. गोमंतकीय भौगोलिक आणि सामाजिक पार्श्वभूमीवरील भाविणीच्या आत्मबलिदानाची ही कथा आहे. गोव्यातील भाविणीची समस्या हाच या कादंबरीचा विषय आहे.

सुभाष भेंडे यांनी 'आमचे गोयं, आमका जाय' या कादंबरीत गोमंतकाच्या पार्श्वभूमीवरील स्वातंत्र्य लढ्याची कथा लिहिली आहे.

गो. नी. दांडेकर यांनी 'पडघवली' मध्ये कोकणामधील पारंपरिक गावगाडा आणि समाजव्यवस्था औद्योगिकीकरणामुळे कोलमडली. खेडी उदध्वस्त झाली. समूहभावना नष्ट झाली. वाढत्या आर्थिक गरजा आणि जीवनाकडे भोगवादी दृष्टीने पाहण्याची नवी विचारसरणी हा कादंबरीचा विषय आहे. हमीद दलवाई यांनी 'इंधन' मध्ये परिवर्तन काळातील हिंदू – मुस्लिम नवबौध्दांच्या सुडसंघर्षाचे चित्रण केले आहे. 'इंधन' सूडभावनेचे प्रतीक आहे. त्या संघर्षास कोकणी प्रदेशाची पार्श्वभूमी लाभली आहे.

व्यंकटेश माडगुळकरांनी 'बनगरवाडी' या कादंबरीत अवर्षणग्रस्त माणदेशातील धनगरांचे जीवनचित्रण केले आहे. हा प्रदेश कमी पावसाचा आणि निकृष्ट जमिनीचा आहे. धनगरांचे जीवनचित्रण करताना हा प्रदेश चित्रित होतो. आनंद यादव यांनी 'गोतावळा' कादंबरीत पारंपरिक ग्रामीण जीवन उपयोगितावादी यंत्रसंस्कृतीच्या प्रभावाने हळूहळू उदध्वस्त होत आहे. हा प्रस्तुत कादंबरीचा विषय आहे. कोल्हापुरी बोलीतील शब्दवैभवामुळे प्रदेश टिपता येतो.

उध्दव शेळके यांना 'धग' या कादंबरीचा परंपरागत ग्रामीण व्यावसायिकांची कुचंबना हा विषय आहे. वैदर्भीय लोकजीवनातील प्रादेशिकता येते.

वर्धा, अमरावती या विदर्भातील जिल्ह्याची भौगोलिक पार्श्वभूमी कथानकास लाभली आहे. मधुकर वाकोडे यांनी 'झेलझपाट' मधून तारूबांधातील कोरकू आदिवासींच्या जीवनाची परवड रेखाटली आहे. सरकारी अधिकारी फायदे आणि व्यापारी यांच्यामुळे कोरकुची पारंपरिक नैसर्गिक जीवनशैली नष्ट होत आहे. अमरावती – परतवाडा मेळघाट परिसरातील कोरकू अदिवासी या जनजातीशी निगडीत प्रदेश विशिष्ट कादंबरी आहे. संवादासाठी वापरलेली कोरकू भाषा, कोरकू लोकगीत, रांगडी हिंदी भाषा इत्यादीतून प्रदेश दृग्गोचर होतो.

रा. रं. बोराडे यांनी 'पाचोळा' मधून परिवर्तनकाळात पारंपरिक गावगाडा उद्ध्वस्त होत असल्याची वेदना चित्रित केली आहे. आधुनिकीकरणामुळे निर्माण झालेली बलुतेदारांची समस्या चित्रण करणे हा उद्देश आहे. तद्नुषंगाने मराठवाड्याचा प्रदेश चित्रित झाला आहे. वासुदेव मुलाटे यांनी 'विषवृक्षाच्या मुळ्या' कादंबरीतून 'भ्रष्टाचाराने पोखरलेले सहकार क्षेत्र' रेखाटले आहे. त्याला बीड – परभणी जिल्हांची पार्श्वभूमी लागली आहे. संवेदनाक्षम माणसाचा सहकार क्षेत्रात होणारा कोंडमारा आणि भ्रष्टाचाराने पोखरलेले सहकार क्षेत्र रेखाटणे हाच लेखकाचा उद्देश आहे. तद्नुषंगाने मानवी भावभावनांच्या चित्रणातूनच प्रादेशिकता दृग्गोचर होते.

## ०८. संदर्भ व टीपा :


१. दांडेकर गो. नी. : 'पडघवली' परिचय प्रस्तावना,
मौज प्रकाशगृह मुंबई,
प्रथमावृत्ती १९५५, द्वि. आ. १९८१,
पारंभीचे पृष्ठ.

२. भावे स. शि. : 'गो. नी. दांडेकरांशी मनमोकळ्या गप्पा'
ललित, १९७६, पृ. ५.

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | शेळके भास्कर | : | 'मराठी कादंबरीतील प्रादेशिकता'<br>स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे<br>प्रथमावृत्ती १९९७, पृ. ६८, |
| ४. | निकुम्ब कृ. ब. | : | 'बनगरवाडी – एक आस्वाद',<br>वैखरी, एप्रिल ते सप्टेंबर १९७२, पृ. ३४. |
| ५. | पाध्ये प्रभाकर | : | 'आस्वाद',<br>मॅजेस्टिक बुक स्टॉल – मुंबई ,<br>प्रथमावृत्ती १९७७, पृ. ७०. |
| ६. | मुलाटे वासुदेव | : | 'ग्रामीण साहित्य स्वरूप व दिशा' ,<br>कैलाश पब्लिकेशन्स औरंगापूर ,<br>औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९९७ पृ. ९७. |
| ७. | कोत्तापल्ले नागनाथ | : | 'पाचोळा आणि दहा समीक्षक' ,<br>साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद ,<br>प्रथमावृत्ती १९८९, पृ. ६५. |
| ८. | बोराडे रा. रं. | : | 'पाचोळा लेखनाची कहाणी' ,<br>'सत्यकथा' ऑगस्ट १९७३, पृ. ५२. |